॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

‘A’ Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. ४ (प्रतिनिधी) :"वृक्ष वल्ली आम्हा सोयरे वनचरे" या संत तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात नव्या शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला.

भाषा अभ्यास प्रशाळेचे संचालक प्रा. म. सु. पगारे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या कार्यक्रमात विद्यापीठातील विविध मान्यवरांच्या हस्ते आंबा, आवळा, चिकू, लिंबू तसेच इतर विविध वृक्षांची लागवड प्रशाळेच्या परिसरात करण्यात आली. यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्या प्रा. पवित्रा पाटील, वित्त व लेखाधिकारी सीए. रवींद्र पाटील, ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. जी. आर. वाणी यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमास हिंदी विभागाचे प्रमुख प्रा. सुनील कुलकर्णी, डॉ. दीपक खरात, डॉ. सुदर्शन भवरे, डॉ. प्रीती सोनी, प्रतिभा गलवाडे, संशोधक विद्यार्थी खेमराज पाटील तसेच शिक्षकेतर कर्मचारी भरत पालोदकर, अश्विन बारी, अमोल कोळी यांच्यासह एम.ए. मराठी, हिंदी व इंग्रजी विषयाचे विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभागाचे डॉ. दीपक खरात यांनी केले.

**बातमी नं. २**

जळगाव, दि. ४ ( प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षामार्फत संगणक शास्त्र प्रशाळेच्या सेमिनार हॉलमध्ये "परिचय पत्र लेखन व मुलाखत तंत्र (Resume Writing & Interview Techniques)" या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत एमसीए, एम.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स आणि एम.एस्सी. आयटी विभागातील एकूण १०८ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यशाळेसाठी कम्युनिकेशन अँड मॅनेजमेंट विषयाच्या प्रशिक्षक डॉ. सुमित्रा चव्हाण या प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना रोजगारक्षम कौशल्यांचा विकास, प्रभावी परिचयपत्र तयार करण्याचे महत्त्व तसेच कॅम्पस मुलाखतींसाठी आत्मविश्वासाने तयारी करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी त्यांनी व्यावसायिक परिचय पत्राचे महत्त्व व उद्देश, एटीएस अनुकूल परिचय पत्र तयार करण्याची पद्धत, परिचय पत्र तयार करताना होणाऱ्या सर्वसाधारण चुका टाळण्याचे उपाय, मुलाखतीसाठी आत्मविश्वासपूर्वक तयारी, एचआर मुलाखतीतील सामान्य प्रश्नांची प्रभावी उत्तरे देण्याची तंत्रे तसेच मुलाखतीदरम्यान व्यावसायिक संवाद कौशल्याचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एमसीए विभागाचे विभागप्रमुख व प्लेसमेंट समन्वयक प्रा. अजय पाटील होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्लेसमेंट अधिकारी सोनाली दायमा यांनी केले. ही कार्यशाळा केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाचे समन्वयक प्रा. उज्ज्वल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडली. इंटर्नशिप समन्वयक श्री. संदीप कुमार तसेच केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाच्या सर्व सहकाऱ्यांनी कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

............................................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ४ ऑगस्ट, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता